विद्या मुक्तांगण परिवार फाउंडेशन

# छोटे कलाम विज्ञान प्रकल्प

लक्ष्य राष्ट्रनिर्मितीचे, माध्यम शिक्षणाचे...!

## ‘छोटे कलाम’बद्दल. .

आजच्या वाढत्या तंत्रज्ञानयुक्त जगात, STEM (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) शिक्षणाचे महत्त्व अजिबात दुर्लक्षिता येणार नाही.

प्रॉब्लेम बेस्ड लर्निंग (PBL) अर्थात समस्या उकलन तंत्र शिकण्याचे प्रभावी साधन म्हणून वापरत STEM शिक्षणासाठी आवश्यक वातावरण तयार करणे, हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. PBL तंत्र हे शालेय अभ्यासक्रमाशी सुसंगत असे केल्याने, विद्यार्थी तार्किक विचार, समस्या सोडवण्याची कौशल्ये आणि सर्जनशीलता वाढवणाऱ्या अनुभवांमध्ये प्रवीण होतील.













## आमच्याबद्दल

विद्योदय मुक्तांगण परिवार फाउंडेशन (उर्फ VMPF) ही एक सामाजिक संस्था आहे जी ग्रामीण शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षण पद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. मुलांसाठी कृतियुक्त शिक्षण अनुभव तयार करण्यासाठी आम्ही शिरोळ तालूक्यातील शाळांसोबत काम करतो.





या प्रयत्नात तुम्ही विनायक (TISS, M.A. Education), Sarsha (TMV, MSW), वर्षा (TISS, Mumbai) यांना साथ द्याल हा विश्वास आहे.

## प्रकल्पाची उद्दिष्टे

- PBL तंत्राद्वारे विद्यार्थ्यांना मूलभूत STEM संकल्पनांचा परिचय करून देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक तत्त्वे आणि वैज्ञानिक स्वभावाची सखोल समज वाढवणे.
- विद्यार्थ्यांची तार्किक विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करणे.
- विद्यार्थ्यांमधील सहयोग, संवाद आणि टीमवर्क कौशल्याला प्रोत्साहन देणे.
- STEM फील्ड आणि त्याच्याशी संभाव्य करिअर मार्गांमध्ये गोडी निर्माण करणे.

## प्रकल्पाचा कृती आराखडा

- अभ्यासक्रम संरचना: PBL ला चालू शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करत युनिक मॉड्यूल असलेला अभ्यासक्रम डिझाइन तयार करणे.
- वैज्ञानिक प्रयोग किट: इयत्ता 5 ते 7 मधील वयोगटांसाठी अनुरूप असे प्रयोग किट खरेदी करणे.
- विद्यार्थी सहभागाचे उपक्रम: सेशन ॲक्टिव्हिटीज, विज्ञान मॉडेल बनवण्याची स्पर्धा आणि विद्यार्थी धड्यांमधील विकसित कौशल्ये वापरून समस्या सोडवण्यासाठीच्या स्पर्धांचे आयोजन करणे.

## प्रकल्पाचे अपेक्षित परिणाम

- STEM विषयांमध्ये चांगल्या दर्जाची शैक्षणिक कामगिरी.
- विद्यार्थ्यांमध्ये STEM बद्दल वाढती आवड आणि उत्साह.
- समस्या सोडवणे, तार्किक विचार आणि डिजिटल साक्षरता कौशल्ये यांत वाढ .
- उपेक्षित समाजापर्यंत पोहोचून STEM फील्डमध्ये सर्वसमावेशक काम.
- करिअरची तयारी आणि महाविद्यालयीन तयारी यावर दूरगामी परिणाम.





# समाजाप्रती आवाहन

'विद्योदय' समाजातील तुमच्यासारख्या सहृदय आणि उदार लोकांच्या आर्थिक मदतीने 'छोटे कलाम...' सारखे अनेक प्रकल्प आणि उपक्रम राबवत आहे.

गेल्या 8 वर्षांपासून या प्रयत्नातून आम्ही 'कुशल' भारतीय तरुणांचे स्वप्न पाहत आहोत. तुम्ही खालीलप्रमाणे प्रकल्पात तुमचे योगदान देखील शेअर करू शकता:

1. या आणि मुलांसोबत तुमचा वाढदिवस साजरा करा.

2. ज्ञानदीप प्रकल्प येथील शाळेला सदिच्छा भेट द्या.

3. ज्ञानदीप प्रकल्पाच्या शाळेतील मुलांसोबत गप्पा-गाणे-गेम खेळायला या आणि आपुलकीचा हात द्या.

4. या प्रकल्पाला आर्थिक मदत करा.



# छोटे कलाम विज्ञान प्रकल्प - पार्श्वभूमी



आर्थिक आव्हाने असलेल्या ग्रामीण भारताकडे शैक्षणिक संसाधने कमी आहेत. 'छोटे कलाम...' प्रकल्प तिथे एक आशेचा किरण म्हणून उदयास आला आहे. 'विद्योदय'ने सुरू केलेला 'छोटे कलाम विज्ञान प्रकल्प' विद्यार्थ्यांच्या जन्मजात कलागुणांना आणि सर्जनशीलतेला वाव देण्याचा प्रयत्न करतो.

विज्ञान आणि गणित यांसारख्या विषयांची अनावश्यक भीती ओळखून, हा अभिनव उपक्रम शालेय अभ्यास अधिक सोपे आणि कालसुसंगत बनवण्यासाठी कृती-आधारित शिक्षणाचा मार्ग दाखवतो. अशा अनुभवांद्वारे तरुण मनांचे संगोपन करून आणि शिकण्याची आवड निर्माण करत 'छोटे कलाम...' पुढील पिढीस भविष्यासाठी आवश्यक कौशल्यांनी युक्त भारत साकार करेल.







**मदतीच्या प्रतीक्षेत . .**

- खात्याचे नाव – Vidyoday Mukatnagan parivar foundation
- बँकेचे नाव- HDFC Bank
- खाते क्र.. – 50200044699397
- IFSC Code – HDFC0000736

प्रकल्पाची जागा -
अब्दुल लाट, शिरवाड,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.


विनायक माळी आणि सार्शा माळी
विद्योदय मुक्तांगण
परिवार फाउंडेशन

संपर्क क्र. : +91 9420608084
इमेल : contactvidyoday@gmail.com
vinayakmali90@gmail.com
संकेतस्थळ : www.vidyoday.org/